**सत्वहीन**

संथ प्रवाही गाणे ,निःसंग निर्झरी गातो
उगा प्रस्तरा बिलगे,क्षणात भोवरा होतो |
खोल अंतरी पाणी, डोहात प्रकाशी बंद
परी शेवाळी दाटली, भयाण शांतता अंध |
गर्द सभोती भीती ,आकांती दिसावी ज्योत
शब्द एकला उरला, विस्मृती गीताचे स्रोत |
कुठे शोधण्या जावे, नितळ निरसा सूर
नदी किनारी उरला, गढूळ जाणिवा पूर |

**----संध्या रानडे**